MHWS080003332022

**<u>रे.मु.नं. ४५/२०२२ मधील निशाणी क्र. ४५ वरील आदेश</u>**

**१.** प्रस्तुत अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रीया संहीतेचे आदेश ०६, नियम १७, आदेश २२, नियम ०४, व कलम १५१ नुसार मूळ दाव्यात दुरुस्ती होवून मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

**२.** वादीचे अर्जातील कथनानुसार, प्रतिवादी क्र.०४ फकिरा कुंडलिक धांडे हे दिनांक ०८.०६.२०२५ रोजी मयत झाले असून त्यांना अर्जात नमूद १ ते ५ वारस आहेत. सदर वारसांना प्रतिवादी म्हणून दाव्याचे कामी रेकॉर्डवर घेणे आवश्यक आहे. त्यामुळे अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली.

**३.** सदर अर्जावर प्रतिवादीतर्फे म्हणणे दाखल केले. प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार, याकामी मृत्यू प्रमाणपत्र व वारसादाखला दाखल केलेला नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करावा.

**४.** दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. संपूर्ण अभिलेखाचे अवलोकन करता वादीने प्रस्तुतचा दावा वाटप व स्वतंत्र कब्जा मिळणेकरिता दाखल केलेला आहे. सदर कामी नि.क्र.३५ वर मुददे काढण्यात आलेले असून वादीचे पुराव्यावर प्रलंबीत आहे. दरम्यान यातील प्रतिवादी क्र.०४ हे दिनांक ०८.०६.२०२५ रोजी मयत झाल्याने त्यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे देण्यात आला. सदर अर्जावर प्रतिवादीतर्फे जरी मृत्यू दाखला व वारसाचा दाखला दाखल केला नसल्याचा आक्षेप नोंदवण्यात आला असला तरी आज रोजी वादीतर्फे कागदयादी नि.क्र.४७ सोबत प्रतिवादी क्र.०४ यांचे मृत्यू प्रमाणपत्र व वारस प्रमाणपत्र दाखल केलेले आहे. त्यामुळे प्रतिवादींच्या म्हणण्यातील आक्षेप गृहित धरता येत नसून सदरची वारसाबाबतची दुरुस्तीचा अर्ज मुदतीत दाखल केलेला असल्याने दाव्याचे वाटपाचे स्वरुप पाहता तो मंजूर करणे नैसर्गिक न्यायतत्वानुसार आवश्यक ठरते. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | वादीचा अर्ज निशाणी क्र. ४५ मंजुर करण्यात येत आहे. |
| २. | वादींना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अर्जात नमूद केल्याप्रमाणे दुरुस्ती आदेशाच्या तारखेपासून १४ दिवसाच्या आत मयत प्रतिवादी क्र.०४ चे वारसांबाबत मूळ दाव्यात करावी व तशी दावा दुरुस्ती प्रत याकामी दाखल करावी. |
| ३. | खर्चाबाबत कोणताही आदेश नाही. |

(सदरचा आदेश खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

PRATAP VISHNU SAPKAL
Digitally signed by PRATAP VISHNU SAPKAL
Date: 2025.09.30 11:42:50 +0530

(पी.व्ही. सपकाळ)

दिनांक २९.०९.२०२५

दिवाणी न्यायाधीश क.स्तर, रिसोड

<u>**CERTIFICATE**</u>

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : H. A. Uchade. |
| Name of court | : C.J.J.D.& JMFC;Risod |
| Date | : 29.09.2025 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | : 29.09.2025 |
| Judgment/Order uploaded on | : 29.09.2025 |